

# शेती पुरक भाजीपाला लागवड व रोपे निर्मिती व्यवसाय

| | | |
|---|---|---|
| **उद्योजक शेतकरी महीलेचे नाव** | : | **सौ. मनिषा गजानन वानखडे** |
| पत्ता | : | मु.पो.हुसनापूर, ता. कळंब जिल्हा: यवतमाळ |
| संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक | : | ९०६७१८९३४५ |
| वय | : | ३२ वर्ष |
| शिक्षण | : | इयत्ता १० वी |
| जमीन धारकता | : | ३ एकर |

## १. कृषि विज्ञान केंद्राचे शेती पुरक भाजीपाला लागवड व रोपे निर्मिती व्यवसायाकरीता मार्गदर्शन

सौ. मनिषा गजानन वानखडे हया ३ एकर मध्ये कापूस सोयाबिन,तूर या पिकाची लागवड करत होत्या या पिक पध्दतीमध्ये अवाजवी खर्च व उत्पन्न कमी यामुळे त्यांनी नगदी पिकाची (भाजीपाला) लागवड करण्याचा मानस केला. यामध्ये मिरची, वांगे, पालक, मेथी, कोथींबीर इ ची लागवड केली.

कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ च्या तांत्रीक मार्गदर्शनातून त्यांनी बेड पध्दतीवर लागवड, बेणे प्रक्रीया, नर्सरीमध्ये रोपे तयार करणे या तांत्रीक बाबीची माहीती वेळोवेळी घेत असत .

## २. शेती पुरक भाजीपाला लागवड व रोपे निर्मिती व्यवसायातून साध्य

शास्त्रीय पध्दतीने मिरचीची लागवड ४० गुठयांमध्ये करून वर्षाकाठी ७०० किलो मिरची उत्पादन घेवून १,०५,०००रू एकुण उत्पादन घेवून त्यामध्ये खर्च ४५–५०,०००वजा करता निवळ नफा रू. ५५–६०,०००० मिळतो.

शास्त्रीय पध्दतीने वांगीची लागवड २० गुठयांमध्ये करून ४ महिण्याच्या पिक कालावधीमध्ये ९५० ते १००० किलो वांगी उत्पादन घेवून सरासरी भाव २० ते २५ रू प्रमाणे १९०००–२५००० रू त्यामध्ये खर्च १३००० ते १४००० वजा करता निवळ नफा रू ६००० ते ११००० मिळतो..

यानंतर त्यांनी भाजीपाल्याची रोपे निर्मीती करीता शेडनेट हाऊसची 20x20 स्केअर फुट वर उभारणी करून यामध्ये वांगी, मिरची, टोमॅटो या भाजीपाला पिकाची रोपे निर्मीती करण्याचे काम सुरू केले. वांगी पिकाची ८००० रोप निर्मीती पासून सुरूवात केली. याकरीता ३००० रू भांडवल गुतंणूक करून २५ ते ३० दिवसानी १ रूपया प्रति रोप या प्रमाणे रोपाची विक्री करून त्यापासून सर्व खर्च वजा करता ५००० ते ६००० रू निवळ नफा मिळतो.

तसेच मिरची पिकाचे पिकाची ७००० रोप निर्मीती पासून सुरूवात केली. याकरीता ३५०० रू भांडवल गुतंणूक करून २५ ते ३० दिवसानी १.२० रूपया प्रति रोप या प्रमाणे रोपाची विक्री करून त्यापासून सर्व खर्च वजा करता ७२०० ते ७३०० रू निवळ नफा मिळतो.

रोपे निर्मीती करीता गावातील व तालुक्यातील जास्तीत जास्त संपर्कातील शेतकरी बांधव संपर्क साधून रोपाची ऑर्डर देत आहेत.




कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ  यांची  सौ. मनिषा गजानन वानखडे यांच्या शेताला प्रक्षेत्र भेट




सौ. मनिषा गजानन वानखडे यांची नर्सरी युनिट